**ठळक बातम्या**

- क्वाड नेत्यांच्या वार्षिक परिषदेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेत दाखल
- आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी घेतली दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ
- गेल्या ४२ दिवसांपासून सुरू असलेला संप कोलकात्यातील आपात्कालीन सेवेतल्या डॉक्टरांकडून मागे
- श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुमारे ८० टक्के मतदान, उद्या निकाल जाहीर होण्याची शक्यता

**आणि**

- भारताविरुद्धच्या मालिकेतल्या पहिल्या कसोटी सामन्यात बांग्लादेशाच्या दुसऱ्या डावात ४ बाद १५८ धावा

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेत दाखल झाले आहे. आज डेलावेअरमधल्या विल्मिंग्टन इथं होणाऱ्या क्वाड नेत्यांच्या सहाव्या वार्षिक परिषदेत सहभागी होणार आहेत. हवामान बदल ते उदयोन्मुख तंत्रज्ञान असे अनेक विषय या परिषदेत चर्चिले जाणार आहेत. कर्करोग रोखण्यासाठी, शोधण्यासाठी आणि त्यावरील उपचारासाठी नाविन्यपूर्ण धोरणाची सुरुवात या परिषदेत होणार आहे. यावेळी ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

अमेरिकेतल्या या तीन दिवसीय दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विविध उच्चस्तरीय बैठका घेणार आहेत. उद्या ते न्यूयॉर्कमध्ये भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. तसंच अमेरिकास्थित कंपन्यांच्या उच्चाधिकाऱ्यांच्या भेटी घेणार आहेत. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला संबोधित करतील.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बेनीज, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा यांच्यासोबत क्वाड परिषदेत सहभागी होण्यासाठी आपण उत्सुक आहोत, असं प्रधानमंत्र्यांनी अमेरिकेला रवाना होण्याआधीच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><>**

छत्तीसगडच्या बस्तर क्षेत्रातल्या नक्षलवाद्यांच्या हिंसेने प्रभावित नागरिकांची आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात भेट घेतली. हिंसेचे कोणत्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नाही असे सांगत राष्ट्रपतींनी नक्षलवाद्यांना हिंसा सोडण्याचं आवाहन केलं. त्यांच्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी सरकार सर्वतोपरि प्रयत्न करेल, असं आश्वासनही दिले.

**<><><><>**

गव्हर्नमेंट ई मार्केटप्लस अर्थात जेमने आपल्या व्यासपीठावर विक्रेते आणि सेवाप्रदात्यांच्या व्यवहार शुल्कात ३३ टक्के कपात केली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने ही माहिती दिली. यावर्षी ९ ऑगस्टपासून जेमनं नवं महसूल धोरण लागू केलं आहे. यानुसार दहा लाखांपर्यंतच्या मागणीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. यापूर्वी ही मर्यादा पाच लाख रुपये होती.

**<><><><>**

आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी आतिशी आणि त्यांच्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राजनिवास या राज्यपालांच्या निवासस्थानी दुपारी हा शपथविधी सोहळा पार पडला. गोपाल राय, कैलाश गेहलोत, सौरभ भारद्वाज, इम्रान हुसेन आणि मुकेश अहलावत यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली.

आतिशी या कलकाजी विधानसभा क्षेत्राच्या आमदार आहेत. काँग्रेसच्या शीला दीक्षित आणि भाजपच्या सुषमा स्वराज यांच्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी

विराजमान होणाऱ्या आतिशी या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री आहेत. दरम्यान, या आठवड्याच्या सुरूवातीला अरविंद केजरीवाल यांनी आपल्या मंत्रिमंडळासह राजीनामा दिला होता.

<><><><><>

अजित पवार यांच्या पक्षाला घड्याळ्याच्या ऐवजी नवीन चिन्ह द्यावं, अशी मागणी शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात केली आहे. घड्याळ हे मूळ राष्ट्रवादी काँग्रेसचं पक्षचिन्ह आहे. पण आता पक्ष कोणाचा हा मुद्दा न्यायालयात प्रलंबित आहे. त्यावेळी आम्हाला तुतारी हे नवीन चिन्ह दिलं त्याचप्रमाणे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही नवीन चिन्ह द्यावं, अशी मागणी या याचिकेत केल्याचं खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. यापूर्वीही अनेकदा ही मागणी केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने त्यांच्या उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी विधानसभेच्या ११ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने नागपूर दक्षिण पश्चिम, छत्रपती संभाजीनगर पूर्व, नांदेड दक्षिण, रावेर, सिंदखेडराजा, खानापूर आदी जागांचा समावेश आहे.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक उद्याच घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं विद्यापीठाला दिले आहेत. या निवडणुकीची सर्व तयारी झालेली असताना राज्य सरकारच्या आदेशावरुन काल अचानक विद्यापीठानं ही निवडणूक स्थगित केली होती. त्याला युवासेनेच्या मिलिंद साटम, शशिकांत झोरे आणि प्रदीप सावंत यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती अतुल

चांदूरकर यांच्या नेतृत्वाखालील विशेष खंडपीठानं तातडीची सुनावणी घेतली आणि उद्याच निवडणूक घेण्याचे आदेश दिले.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील कनिष्ठ डॉक्टर आपत्कालीन सेवेत रुजू झाले आहेत. गेले ४२ दिवस सुरू असलेला संप त्यांनी मागे घेतला. कोलकात्यातील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येच्या निषेधार्थ हे कामबंद आंदोलन सुरू होते. मात्र या डॉक्टरांनी बाह्यरुग्ण सेवा सुरू केलेली नाही. त्यांचा लढा न्यायालयामार्फत सुरूच राहिल असं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, राज्य सरकारनं सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी दहा कलमी निर्देश जारी केले आहेत.

**<><><><><>**

हवाई दलाचे प्रमुख म्हणून एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांची नियुक्ती झाली आहे. सिंग हे सध्या हवाई दलाचे उप प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. येत्या ३० तारखेला सिंग हे विद्यमान एअर चीफ मार्शल विवेक चौधरी यांच्याकडून हवाई दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारतील. सिंग यांनी त्यांच्या ४० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत विविध कमांडसाठी, निर्देशक तसंच परदेशी नियुक्तींसाठी काम केलं आहे. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालय आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयातून शिक्षण घेतलं असून त्यांना ५ हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणांचा अनुभव आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आज ७५ ते ८० टक्के मतदान झालं. निवडणूक नियमांच्या उल्लंघनाच्या किरकोळ घटना वगळता मतदान शांततेत पार पडलं. टपाली मतांच्या मोजणीपासून मतमोजणीला सायंकाळपासून सुरुवात झाली

आहे. टपाली मतांचा निकाल आज रात्रीपर्यंत तर अंतिम निकाल उद्या जाहीर होणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली.
राष्ट्राध्यक्षपदासाठी तिरंगी लढत होत आहे. रानिल विक्रमसिंघे, अनुरा कुमार दिसनायके आणि साजित प्रेमदासा यांनी आर्थिक अस्थिरता आणि भ्रष्टाचारासारख्या मुद्द्यांवर प्रचार केला आहे. निवडणुकीसाठी एकूण ३८ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><>**

पाकिस्तान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना वचकून असून याचा परिणाम जम्मू सीमारेषेपलीकडून बराच कालावधी शस्त्रसंधीचे उल्लंघन न झाल्याच्या स्वरूपात आपल्याला दिसत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज जम्मूच्या पूंछ जिल्ह्यात मेंढार इथं निवडणूक प्रचारसभेत बोलत होते. यामुळेच सीमाभाग शांत असून मेंढार आणि इतर सीमावर्ती जिल्ह्यातली जनता शांततेनं जीवन व्यतित करत असल्याचं त्यांनी सांगितलं. याआधीच्या सरकारांच्या कार्यकाळात इथल्या जनतेला त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवलं गेल्याचा आरोप त्यांनी केला

**<><><><>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना मिळत असलेल्या धमक्यांच्या विरोधात आपला पक्ष आंदोलन करणार असल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. ते आज जम्मू इथं काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारसभेसाठी आले असताना वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><>**

झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल हे झारखंडच्या विकासातले अडथळे असल्याचा आरोप संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केला. इतखोरीमध्ये

एका जनसभेला ते संबोधित करत होते. यावेळी त्यांनी झारखंड राज्य सरकारवर भ्रष्टाचाराचा आरोप केला.

**<><><><><>**

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतानं विजयासाठी दिलेल्या ५१५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशनं आपल्या दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेर ४ बाद १५८ धावा केल्या आहेत. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर सुरू असलेल्या या सामन्याच्या पहिल्या डावात भारतानं ३७६ धावा केल्या, तर बांगलादेशचा पहिला डाव १४९ धावांवर आटोपला होता. भारताच्या दुसऱ्या डावात शुभमन गिलच्या ११९ तर रिषभ पंतच्या १०९ धावांच्या धडाकेबाज खेळीनंतर भारतानं आपला दुसरा डाव ४ बाद २८७ धावसंख्येवर आज घोषित केला. त्यामुळं बांगलादेशसमोर विजयासाठी ५१५ धावांचं मोठं आव्हान राहिलं असून सामन्याचे दोन दिवस अद्याप बाकी आहेत. या सामन्यात भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहनं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० बळींचा टप्पा ओलांडला.